श्री. क्षेत्र पंढरपूर येथे आषाढी वारी-२०२६ निमित्त पालखी सोहळ्या सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांकरीता प्रतिबंधात्मक व उपचारात्मक आपत्कालीन सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने तीन दिवसाचे महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यासाठी साहित्य सामुग्री व इतर बाबींची खरेदी करण्याकरीता रु.१,५०,००,०००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः प्रशामा -१२२६/प्र.क्र.१२०/खरेदी कक्ष (ई-ऑफीस क्र.१७२६११०)

१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : २९ जून, २०२६

वाचा :-

१. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५
२. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६
३. सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्र.आसेआ/कक्ष-३/टे-४/ई-नस्ती क्र.१२०२३७/आषाढी वारी २६ आरोग्य शिबिरे/८६६०-६२/२०२६, दि.२२.०६.२०२६

प्रस्तावना:-

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात प्रतिवर्षी प्रमाणे पुणे व सोलापूर जिल्हयामध्ये “आषाढी वारी सन २०२६” चा पालखी सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. श्री. क्षेत्र पंढरपूर येथे आषाढी वारी-२०२६ निमित्त पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांकरीता प्रतिबंधात्मक व उपचारात्मक आपत्कालीन सुविधा पुरविण्याकरीता तीन दिवसांचे महाआरोग्य शिबीराचे नियोजन करण्याच्या दृष्टीने सेवा पुरवठा, आवश्यक साहित्य सामुग्री व इतर बाबींची खरेदी करण्याकरीता वाचा येथील अ.क्र.३ अन्वये सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांनी लेखाशिर्ष २२१० ०१४६ अंतर्गत १३-कार्यालयीन खर्च या उद्दिष्टांतर्गत एकूण रु.१,५०,००,०००/- इतक्या रक्कमेच्या सादर केलेल्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

श्री. क्षेत्र पंढरपूर येथे आषाढी वारी-२०२६ निमित्त पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांकरीता प्रतिबंधात्मक व उपचारात्मक आपत्कालीन सुविधा पुरविण्यासाठी तीन दिवसांचे महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्याकरीता “विवरणपत्र-अ” मधील सेवा पुरवठा, आवश्यक साहित्य सामुग्री व इतर बाबींची खरेदी करण्यासाठी लेखाशिर्ष २२१० ०१४६ अंतर्गत १३-कार्यालयीन खर्च या उद्दिष्टांतर्गत रु.१,५०,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पन्नास लक्ष फक्त) एवढया रक्कमेच्या खर्चास खालील नमुद केलेल्या अटींच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.:-

(१) श्री. क्षेत्र पंढरपूर येथे आषाढी वारी-२०२६ साठी महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्याकरीता सेवा पुरवठा व खरेदी करण्यात येणाऱ्या साधनसामुग्रींची आवश्यकता, मागणी याची शहानिशा/ खातरजमा करण्यात आल्या नंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

(२) प्रस्तावात नमूद इव्हेंटबेस सेवा विषयक बाबींकरीता ई-निविदा प्रक्रिया राबवुन बाह्यस्त्रोत एजन्सी मार्फत पुरवठादार निश्चित करण्यास तसेच प्रस्तावातील बाबी ह्या तातडीच्या व अत्यावश्यक असल्याने त्यासाठी अल्प मुदतीची निविदा प्रसिध्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(३) खरेदी करण्यात येणाऱ्या साधनसामुग्रींचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तात्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल, अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात आल्यानंतरच सदर बाबींचीखरेदी प्रक्रिया करण्यात यावी.

(४) महाआरोग्य शिबीराकरीता प्रस्तावित असलेल्या सेवा विषयक बाबी व आवश्यक साधन सामुग्रींची खरेदी ही तातडीची असल्याने सदर खरेदी उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांचे अधिनस्त असलेल्या जिल्हा शल्य चिकित्सक, सोलापूर यांचे स्तरावरुन शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ मधील तरतूदीनुसार करण्यास मान्यता देण्यात येत आहे. याकरीता शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/ विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

(४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित सेवा पुरवठा व साधन सामुग्री खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

(६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (Pre/Post-dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देशन (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी. हीच बाब खरेदी करण्यात आलेल्या बाबींकरीता तपासूनच प्रलंबित देयकांची अदायगी करावी.

(७) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची संबंधित कार्यक्रम प्रमुख यांनी दक्षताघेण्यात यावी.

(८) सदरची खरेदी व सेवा पुरवठा प्रशासकीय मंजुरीच्या विहित कालावधीत व प्रशासकीय मान्यता रक्कमेत पूर्ण होईल याची, तसेच सदर बाबींच्या खरेदीची द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

(९) महाआरोग्य शिबीराच्या अनुषंगाने सेवा पुरवठा/खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा संपुर्ण अहवाल उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करण्याची जबाबदारी जिल्हा शल्य चिकित्सक, सोलापूर यांची राहील.

(१०) प्रस्तुत सहायक अनुदानाची देयके कोषागारातून आहरीत करण्यासाठी "प्रशासकीय अधिकारी, जिल्हा रुग्णालय, सोलापूर" यांना "आहरण व संवितरण अधिकारी" व "जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सोलापूर" यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(११) श्री. क्षेत्र पंढरपूर आषाढी वारी सन २०२६ निमित्त पंढरपूर येथे आयोजित आरोग्य महाआरोग्य शिबीराच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी यशस्वी होईल या दृष्टीने, आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांनी सदर कार्यक्रमावर नियंत्रण ठेवावे.

२. उपरोक्त अनुक्रमाक १ ते १० येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे व सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांची राहील.

३. या कामी होणारा खर्च, "मागणी क्र. आर-१, ११०, रुग्णालये व दवाखाने (०१) मुफसल रुग्णालये व दवाखाने (०१) (०१) मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये (अनिवार्य), २१-पुरवठा व सामग्री, १३-कार्यालयीन खर्च व २४-पेट्रोल, तेल व वंगण २२१००१४६" या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतुन भागविण्यात येऊन तो सदरहू लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा,

४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु क्रमांक ४, नियम क्र. ७ अन्वये अवजारे, किरकोळ साधन सामग्री आणि उपक्रम संचे विकत घेण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासनिक विभागास पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आले आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६२९१०३९१४०९१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHANDRAKANT HARIDAS WADE

Digitally signed by CHANDRAKANT HARIDAS WADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=fda96a8ca4dd3ecbdbbe4b156e5eaa93f60f3e037cbbbbdefe9e2961f45f0960, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9474E7143B2BC3FD96E8D7BF07D1CE51DE8461D4C34AE1E3F643C11B54523936, cn=CHANDRAKANT HARIDAS WADE
Date: 2026.06.29 11:39:18 +05'30'

(चंद्रकांत ह. वडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुबई.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई.
३) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई
४) संचालक, आरोग्य सेवा (प्राथमिक), आरोग्य संचालनालय, पुणे
५) सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई
६) उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे
७) जिल्हा शल्य चिकित्सक, पुणे
८) जिल्हा शल्य चिकित्सक, सोलापूर
९) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई
१०) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखापरीक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर
११) अधिदान व लेखाधिकारी, मुबई.
१२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

(शासन निर्णय क्र.प्रशामा-१२२६/प्र.क्र.१२०/खरेदी कक्ष, दि.२९.०६.२०२६ चे सहपत्र)

विवरणपत्र-अ

(रक्कम लाखात)

अ.क्र	आरोग्य शिबिर नियोजनाची बाब	अंदाजित खर्च	लेखाशीर्ष व उद्दिष्ट
१	आरोग्य शिबिराकरीता मंडप व त्याकरीता आवश्यक बाबींवरील खर्च	रु.४०.०० लक्ष	२२१० ०१४६ १३-कार्यालयीन खर्च
२	शिबिराकरिता बैठक व्यवस्था, फर्निचर, टेबल व खुर्ची भाडे इत्यादी	रु.११.०० लक्ष	
३	स्वच्छतागृहांची व्यवस्था, मोबाईल, टॉयलेट ब्लॉक इत्यादी	रु.१०.०० लक्ष	
४	शिबिराकरीता पंढरपूर या ठिकाणी येणाऱ्या प्रतिनियुक्ती केलेले डॉक्टर्स, नर्सेसे व इतर कर्मचाऱ्यांकरिता जेवण नाष्टा व पाणी इ.	रु.२५.०० लक्ष	
५	आरोग्य शिबिराकरीता जागा भाडे खर्च इत्यादी	रु.६.०० लक्ष	
६	सी.सी.टी.व्ही. व डिजीटल स्क्रीन व्यवस्था उभारणी इत्यादी	रु.१०.०० लक्ष	
७	आरोग्य शिबीराकरीता पंढरपूर या ठिकाणी येणाऱ्या प्रतिनियुक्ती डॉक्टर्स, नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांकरिता राहण्याची व्यवस्था	रु.२५.०० लक्ष	
८	आकस्मिक खर्च (केसपेपर, कार्डस, इंटरनेट, वॉकीटॉकी इत्यादी)	रु.१५.०० लक्ष	
९	वीज कनेक्शन व वीज बिल	रु.३.०० लक्ष	
१०	वाहतुक व्यवस्था व इंधन खर्च इत्यादी	रु.५.०० लक्ष	
	एकूण अंदाजित खर्च	**रु.१५०.०० लक्ष**	